# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः11.09.2024** **वारःबुधवार**

---

1. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सक्षम करण्यासाठी कुटुंब भेट अभियानाचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रारंभ
2. धुळे जिल्हा लवकरच औद्योगिक जिल्हा म्हणून ओळखला जाईल-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विश्वास
3. मराठवाड्यातील जायकवाडी धरणासाठी अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातून पाणी सोडण्याच्या निर्णयाचा पुनर्विलोकन आढावा घेऊन अभ्यास गटाला अहवाल देण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश
4. श्री गणरायापाठोपाठ गौराईचं घराघरात सोनियाच्या पावलांनी आगमन आणि,
5. विदर्भात काही ठिकाणी अति जोरदार पावसाचा हवामान विभागाचा इशारा

**<u>मुख्यमंत्री</u>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सक्षम करण्यासाठी राज्यभरात लाभार्थी कुटुंब भेट अभियानाची सुरुवात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल केली. शिवसेनेचा प्रत्येक कार्यकर्ता दररोज 15 कुटुंबांची भेट घेऊन त्यांना या योजनेचा लाभ मिळाला आहे की नाही, हे तपासून पाहील आणि, हा लाभ मिळाला नसेल, तर संबंधित कुटुंबाला मार्गदर्शन करून अडचणी दूर करेल, असं शिंदे यांनी सांगितलं. मुख्यमंत्री ठाण्यात वार्ताहरांशी बोलत होते.

**<u>सिंचन-फडणवीस-धुळे</u>**

राज्याच्या औद्योगिक भागात आता लवकरच धुळ्याचे नाव असेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल धुळ्यात व्यक्त केला. धुळे जिल्ह्यातल्या जामफळ धरणावरून शिंदखेडा तालुक्यातल्या 54 गावांना शेतीसाठी थेट वाहिनीद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या 'बंदिस्त नळ वितरण प्रणाली' या योजनेचा शुभारंभ काल फडवणीस यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. सहा राष्ट्रीय महामार्ग, मनमाड-इंदूर रेल्वे मार्ग आणि सुलवाडे-जामफळ-कनोली जल प्रकल्पामुळे सिंचनाची सोय या सर्व सुविधा इथे उपलब्ध होत असल्याचा आनंद फडणवीस यांनी व्यक्त केला. या योजनेचा लाभ 26 हजार 907 हेक्टर क्षेत्राला होणार आहे.

**<u>फळ लागवड</u>**

राज्यात फळ लागवडीस शेतकरी मोठ्या प्रमाणात प्राधान्य देत असून भौगोलिक मानांकनं प्राप्त फळांच्या लागवडीस विशेष चालना देण्याच्या दृष्टीनं प्रयत्न करावेत, अशा सूचना फलोत्पादन मंत्री दादा

भुसे यांनी काल मुंबईत दिल्या. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियाना संदर्भात आयोजित आढावा बैठकीत भुसे यांनी दूरस्थ पद्धतीनं अधिकाऱ्यांशी संवाद साधतांना या सूचना दिल्या.

**पाणी वाटप-नाशिक**

मराठवाड्यातील जायकवाडी धरणासाठी नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यातल्या धरणांमधून पाणी सोडण्यात येतं. समन्यायी पाणी वाटप संदर्भात यापूर्वी उच्च न्यायालयांनं आदेश देताना दर पाच वर्षांनी या संदर्भात पुनर्विलोकन करण्याचे आदेश दिले होते. मात्र, अद्याप अशा प्रकारचा आढावा घेतला गेलेला नाही. त्यामुळे शासनानं नियुक्त केलेल्या अभ्यास गटाला एक महिन्याची मुदतवाढ द्यावी आणि या कालावधीत त्यांनी पुनर्विलोकन अहवाल जलसंपदा विभागाच्या महाराष्ट्र जलसंपदा नियामक प्राधिकरणाला द्यावा असे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं दिले आहेत. नाशिकचं पाणी जायकवाडीला देण्यास विरोध करणाऱ्या याचिकेच्या सुनावणी दरम्यान उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठानं हे आदेश दिले आहेत.

**विमानतळ-सोलापूर**

सोलापूर शहरातल्या विमानतळाची 'नियमन आणि सुरक्षा निरीक्षण प्रणाली' द्वारे सुरक्षितता आणि हवाई सक्षमता तपासणी करण्यासाठी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाचे अधिकारी काल सोलापुरात दाखल झाले. हे अधिकारी आज आणि उद्या सोलापूर विमानतळावरून विमान सेवा सुरू करण्याच्या अनुषंगानं विमानतळाची पाहणी आणि तपासणी करणार आहेत. सोलापूर विमानतळाला प्रवासी विमान वाहतूक सुरू होण्याआधी विविध विभागांकडून चाचण्या आणि तपासण्यांना सामोरं जावं लागत आहे. त्यानंतरच हा विमानतळ कार्यान्वित होणार आहे.

**एकगांव-एक गणपती-सांगली**

लहान मोठ्या गावांतून गल्लोगल्ली सार्वजनिक गणपती स्थापन व्हायला लागल्यानंतर एक गाव एक गणपती ही संकल्पना पुढे आली. सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करण्यामागे सर्व समाजाला एकत्र आणण्याचं असलेलं उद्दिष्ट ही संकल्पना पूर्ण करते. पालघर जिल्ह्यातल्या ऊर्से ह्या छोट्याश्या गावात 1973 पासून एकच गणपती बसवला जातो. हिंगोली जिल्ह्यातल्या 305, नाशिक मधल्या 804 तर वाशिम जिल्ह्यातल्या 225 गावात एकच गणपती बसवला जातो. सातारा जिल्ह्यातल्या 571 तर सांगली जिल्ह्यातल्या 79 गावांत एकाच ठिकाणी बाप्पा विराजमान झाले आहेत.

**गौरी**

गणरायापाठोपाठ परंपरेनुसार काल घराघरात सोनपावलांनी गौराईचं आगमन झालं. माहेरी येणाऱ्या ज्येष्ठा आणि कनिष्ठा या माहेरवाशिणी असल्याची समजूत असल्यामुळे माहेरवाशिणिंचा यावेळी मोठा मान असतो. मुखवट्याच्या, उभ्या, तेरड्याच्या, खडयांच्या अश्या विविध स्वरूपातल्या गौरी घराघरात सजल्या असून आज या गौरायांना पारंपरिक पद्धतीचे पदार्थ खाऊ घालण्यासाठी गृहिणींची लगबग सुरू आहे.

**परीक्षा**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीनं घेण्यात येणारी शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात टीईटी 10 नोव्हेंबरला घेतली जाणार आहे. यासाठी 30 सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन पद्धतीनं अर्ज भरता येणार आहे. अर्ज भरणे, शुल्क याबाबतची माहिती परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

**मुले-सुरक्षितता-अकोला**

अकोला जिल्ह्यात शालेय मुला-मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनं 1 हजार 825 शाळांमध्ये सखी सावित्री समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. शाळा स्तरावरील या समित्या मुलांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांची कार्यवाही करणार आहेत.

**अवयवदान-अकोला**

मृत्यूनंतर एका व्यक्तीनं केलेलं अवयवदान अनेकांसाठी आयुष्य देणारं ठरतं. त्यामुळे प्रत्येकानं अवयवदानाचा संकल्प करावा आणि 'मरावे परी अवयवरुपी उरावे' हे ब्रीद सार्थ करावं, असं आवाहन केंद्रीय आयुष, आरोग्य आणि कुटुंबकल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं. अकोला कृषी उत्पन्न बाजार समिती इथे आयोजित अवयवदान जनजागृती महाअभियान सोहळ्यात ते काल बोलत होते. अवयवदान महाअभियान सोहोळ्याच्या प्रारंभी आरोग्य दिंडी काढण्यात आली. समारंभात उपस्थितांकडून अवयवदानाची शपथ घेण्यात आली. नेत्रदान आणि अवयवदानाचा संकल्प केलेल्या व्यक्तींचा कृतज्ञता पत्र देऊन सन्मान करण्यात आला.

**चपट्या**

पावसाळ्याच्या दिवसांमध्ये रक्तदान शिबिरांची संख्या कमी झाली असून 15 ऑगस्टनंतर रक्तदान शिबिरंही हव्या तेवढ्या प्रमाणात झालेली नाहीत. त्यामुळे प्लेटलेट्सच्या मागणीत 30 ते 35 टक्क्यांनी वाढ झाल्याचं पुण्यातल्या रक्तपेढ्यांनी सांगितलं. गेल्या काही दिवसांपासून शहर आणि परिसरात डेंग्यू आणि पावसाळी आजारांच्या रुग्णांचं प्रमाण वाढल्यानं ही मागणी वाढली आहे. त्यामुळे अधिकाधिक रक्तदात्यांनी रक्तदानासाठी पुढे येण्याचं आवाहन रक्तपेढ्यांनी केलं आहे.

**पुतळा प्रकरण-सिंधुदुर्ग**

राजकोट इथला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्या प्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या जयदीप आपटे आणि बांधकाम रचना सल्लागार डॉक्टर चेतन पाटील यांना काल मालवणच्या न्यायालयात हजर करण्यात आलं. यात आपटे याला 13 सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी तर पाटील याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

**साळवी-निधन-रत्नागिरी**

रत्नागिरी जिल्ह्यातले शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार विजय तथा अप्पा साळवी यांच्या पार्थिव देहावर काल अंत्यसंस्कार करण्यात आले. साळवी यांचं सोमवारी रत्नागिरीत वृद्धापकाळानं निधन झालं. ते 95 वर्षांचे होते. साळवी यांनी 1995 ते 1999 या काळात आमदार म्हणून

राजापूर विधानसभा मतदारसंघाचं प्रतिनिधित्व केलं. विविध शासकीय समित्यांमध्ये, तसंच अनेक सामाजिक संस्थांच्या कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता.

**हल्याळ-निधन**

एकपात्री, नाट्य, चित्रपट, मालिका अशा विविध माध्यमातून गेली पन्नासहून अधिक वर्षे रसिकांचं मनोरंजन करणारे जेष्ठ रंगकर्मी, हास्य कलाकार दिलीप हल्याळ यांचं काल पुण्यात हृदयविकारानं निधन झालं. ते 65 वर्षांचे होते. 'बंपर लाफ्टर, नजराणा हास्याचा' या कार्यक्रमातून त्यांनी रसिकांच्या मनात आनंदाची पेरणी केली. एकपात्री कलाकार परिषदेचे ते माजी अध्यक्ष होते.

**जायकवाडी-बीड**

जायकवाडी धरण या वर्षी पूर्ण क्षमतेनं भरलं असून धरणाचे 18 दरवाजे अर्ध्या फुटाने उचलण्यात आले आहेत. गोदावरी नदीपात्रात सुरू असलेल्या विसर्गामुळे बीड जिल्ह्यातल्या गोदावरी नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दरण्यात आला आहे. यंत्रणांना सज्ज राहण्याचे आदेश जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिले आहेत.

**गोसेखुर्द-भंडारा**

गोसेखुर्द धरणातून 1 लाख 90 हजार क्यूसेक या प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात येत असून, नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावं, असं आवाहन भंडारा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागानं केलं आहे.

**पूर-गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्याच्या विविध भागात मुसळधार पाऊस पडल्यानं 17 मार्गांवरील वाहतूक ठप्प झाली आहे. विविध भागात अडकलेल्या नागरिकांची सुटका करण्यात आली आहे.

**हवामान**

विदर्भात काही ठिकाणी आणि मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह मुसळधार पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार